International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.4 Mar – Apr 2022

# भारतातील आदिवासींचा धर्म व धर्मश्रद्धा

**प्रा. आर. पी. वाडते**
विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

**प्रविण रणबागले**
सहा. प्राध्यापक,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

**प्रस्तावना:**

धर्म हि एक वैश्विक स्वरूपाची सामाजिक संस्था आहे. "ईश्वराने माणसाला निर्माण केले की, नाही हा वादाचा प्रश्न आहे मात्र माणसाने धर्म निर्माण केला हे वादातीत सत्य आहे. "

जगात असा एकही समुदाय नाही की, तेथे धर्म नाही मग तो आदिम , ग्रामीण व प्रगत समुदाय असो तेथे धर्माचे अस्तित्व आढळते. मात्र धर्माचे स्वरूप सर्वच ठिकाणी सारखे नसते मानवाचा विकास होत असताना एका टप्प्यावर धर्माची निर्मिती झाली असावी असे काही विचारवंताचे मत आहे. परंतु ते पूर्णपणे खरे नाही.

भारतात हिंदू,मुस्लिम,ख्रिश्चन, जैन,बौद्ध,पारशी, इत्यादी धर्म दिसून येतात मात्र त्यांचे स्वरूप सारखे नाही. कोणत्याही धर्माची निर्मिती मानवी जीवनाच्या अनिश्चितेतून होत असते. मनुष्य हा सतत सुखाच्या शोधात असतो. निसर्गातील घटनांशी तो नेहमीच मिळतेजुळते घेण्याचा प्रयत्न करीत असतो. मानवाला त्याच्या जीवनात अनेक प्रश्नांची उत्तरे शोधात अली नाहीत. उदा स्वप्न पडते, स्वप्नात मृत व्यक्ती भेटते, ऊन,वादळ,वारा, पाऊस, भूकंप, ज्वालामुखी, जन्म-मृत्यू इत्यादी ची उकल न झाल्याने मनुष्य निसर्ग शक्तीपुढे हतबल झाला. त्याची सुरक्षा धोक्यात आली त्यामुळेच अलौकिक अथवा दिव्या शक्तीवरील त्याची श्राद्ध वाढली व त्या शक्तीला प्रसन्न करण्यासाठी पूजा,अर्चा होम,हवन इत्यादी गोष्टी सुरु केल्या. यातूनच धर्माची निर्मिती झाली.

आदिम समाज जीवनाच्या सर्व अंगावर धर्माचा मोठा प्रभाव पडला त्याच बरोबर आदिम जीवनात धर्म व जादू हे एकमेकात मिसळलेले आहेत . एडवर्ड टायलरच्या मते "अलौकिक

प्राण्यांवरील श्रद्धा किंवा विश्वास म्हणजे धर्म होय."तर मॅलिनोस्की यांच्या मते "धर्म हि कृती करण्याची एक पद्धत आहे. त्याचबरोबर श्रद्धेची व्यवस्था हि आहे."तसेच समाजशास्त्रीय घटना व व्यक्तिगत अनुभूती हि आहे.

**आदिवासीतील धर्मश्रद्धा :**

"धर्म ही श्रद्धा व विधीची व्यवस्था आहे. धर्माची उभारणी ही अलौकिक शक्तीच्या आधारे झालेली आहे. अर्थातच त्या शक्तीचा मानवी कृतीशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे यातूनच धर्मश्रद्धा निर्माण होतात. आदिमांच्या धर्मात काही निश्चित अशा श्रद्धा आढळतात. यामध्ये सर्वात्मवाद,शक्तीवाद,निसर्गवाद व देवकवाद इत्यादी श्रद्धा आढळतात.

भारतातील काही आदिवासी समाजातील धर्म व जादू या विषयीच्या श्रद्धा व आचार पुढील प्रमाणे.

१. **तोडा** :- तोडा समजत काही लोक मांत्रिक,जादूगार तर काही भविष्य कथन करणारे आहेत.

२. **कौल लावणे** : तोडा जमातीतील आपल्या प्रश्नांनाही उत्तरे मिळविण्यासाठी देवाला कौल लावतात. कौल लावणारा तोडा म्हणजे तो भगतच होय. त्याला प्रश्न विचारला असता त्याच्या अंगात येते. तो काही विशिष्ठ शब्द बरळतो व विशिष्ठ देवतेला आवाहन करतो. एखाद्या तोंडावर जेव्हा संकट येते तेव्हा तो भगताकडे धाव घेतो. अथवा कुटुंबातील व्यक्ती निर्वतल्यास, म्हैस आजारी पडल्यास, म्हैस दूध कमी देत असल्यास, तोडा भगताकडे जातो. भगत देवीला प्रसन्न करून घेण्यासाठी काही उपचार सांगतो.

**३. चेटूक:-**बाप आपल्या एकाच मुलाला चेटकी विद्या शिकवतो. चातकाचा परिणाम नाहीसा करण्यासाठी मांत्रिक काही उपाय सुचवतात. एखाद्या श्रीमंताने पैशाबाबत फसविले तर त्याच्यावर कपट प्रयोग केले जातात.

४. **बदागा** :-बदागा लोक तोडा जादूगाराची मदत व सल्ला घेतात. कुरुंबा ह्या जमातीतील चेटकी माणसाने चेटूक केल्यास तोडा लोक फार भितात. कारण चेटकीचा मलेरियाशी संबंध असतो.

५. **दृष्ट** :-एखाद्या व्यक्तीला "तू फार चांगला दिसतोस अथवा तू फार चांगले कपडे घातले आहेत."असे म्हटले किंवा जेवताना त्याच्याकडे कोणी एकटक पहिले तर बघण्यासाठी दृष्ट लागते. अशी समजूत आहे. दृष्ट लागल्यामुळे त्या माणसाला अपचन होते तेव्हा समाजात मिठाने दृष्ट काढण्याचा प्रघात आहे. हे मीठ नंतर आगीत टाकले जाते. डोकेदुखी,पोटदुखी, छाती दुखणे, सर्पदंश होणे, इत्यादींवर इलाज करणारे काही ठराविक मांत्रिक असतात. चेटूक करणारा माणूस अथवा मांत्रिक हा विध्वंसक देवतेकडून आपल्याला हवी असणारी कृत्ये करून घेतो.

६. **शकुनापशकून** :-रस्त्यावर काही ठराविक जनावर दिसल्यास शुभाशुभ मानले जाते. एखाद्यास भेटावयास जात असताना कोकिळा डाव्या बाजूस दिसल्यास अपशकुन झाला असे मानून तोडा लोक परत घरी येतात. मात्र कोकिळा उजव्या बाजूस दिसल्यास तो शकुन मानतात.

७. **पूजा साहित्याचे महत्व**:-निलगिरीपर्वतावर देवतांची सभा आहे. तोंडामध्ये जवळजवळ १८०० देव आहेत. प्लिव हा त्यांचा सर्वात प्राचीन देव आहे. निलगिरी पर्वतावरील टेकड्या व देवता यामध्ये परस्पर संबंध आहेत. प्रत्येक देव एका स्वतंत्र टेकडीवर असतो. तेथे टिपख व पखवेर या दोन जलदेवता आहेत. या जमातीत लिंगपूजा केली जात नाही. अलीकडील काळात त्यांच्यात धर्माविषयी श्रद्धा पुसट होत चालली आहे. ते देवापेक्षा पूजा साहित्याला जास्त महत्व देतात. रिव्हर्स यांच्या मते काही दिवसांनी तोडा लोकांची श्रद्धा संपुष्टात येईल.

८. **मृतात्मे व भूत यावरील श्रद्धा** :-भिल्लांच्या जीवनात मृतात्मे व भुते याना फार महत्व आहे. धार्मिक कार्यक्रमात ब्राम्हणाला अजिबात स्थान नसते. घोडा या प्राण्याला यांच्यात आदरणीय मानले जाते. वेंकटाचार यांच्या मते नर मेघांची प्रथा होती.

९. **बडा माडिया** :-मध्य प्रदेशातील बस्तर जिल्ह्यातील अबुत माड या गावाच्या डोंगरावर बडा माडिया वास्तव्य करतो. हा आदिवासी जंगली म्हैस व सांबाराची शिंगे लावून नाचतो. हा आदिम कपडे घातलेल्या लोंकाचा तिरस्कार करतो. हनीमूनच्या अगोदर बायसन प्राण्याची शिकार करतात अन्यथा हनिमून थांबवतात.

**१०. सर्वात्मवाद** :-एडवर्ड टायलर च्या संशोधनात असे दिसून येते कि आदिम समाजात आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रद्धा आढळते. हि श्रद्धाच धर्माचे प्रारंभिक रूप आहे. व यालाच सर्वात्मवाद असे म्हणतात.

**११. शक्तीवाद** :- विश्वातील सर्व वस्तूमध्ये विलक्षण अशी शक्ती वास करत असते. अशी अंदमानची श्रद्धा यालाच शक्तीवाद असे म्हणतात. या शक्तीचे ज्ञान मानवाच्या इंद्रियांना होत नाही.

**१२. निसर्गवाद** :-मॅक्स मुल्लरच्या मते निसर्गवाद हा आदिम समाजातील धर्मश्रद्धेचा एक प्रकार आहे. हि श्रद्धा निसर्गाच्या अज्ञानावर आधारित आहे. यामध्ये अलौकिक शक्तीवर भर दिला आहे.

**१३. देवकवाद** :-एमिल दुर्खीम च्या मते देवकाच्या उपासने वेळी सदस्यांना सामूहिक संवेदनांची अनुभूती येते. देवकाविषयी त्यांना आदरयुक्त भीती वाटते देवकास ते ईश्वर मानतात. देवकामध्ये व्यक्तीपेक्षा ईश्वरास जास्त महत्व दिले जाते. ईश्वराच्या हाती व्यक्तीचे संपूर्ण भवितव्य आहे अशी श्रद्धा बाळगली जाते.

अशा प्रकारे भारतातील आदिवासी समाजात अनेक प्रकाच्या धर्मश्रद्धा आढळून येतात. अलौकिक शक्तीच्या कृपेवरच आपली सुख दुःखे अवलंबून आहेत. अशी आदिमांची गाढ श्रद्धा आहे.

**संदर्भ** :


१. मानवशास्त्र- य. श्री. मेंहदळे

२. आदिवासींचे सामाजिक जीवन - प्रा. चंद्रकांत खंडागळे.

३. सामाजिक मानवशास्त्र - कोंडेकर मंगल पाटील